# पाठ - 6

## पुस्तिका 5

## स्विकारलेले किंवा नियंत्रणात असलेले किंवा कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम सुचना नियम पुस्तिका आणि अभिलेख

# प्रकरण - 6

## कर्तव्य पालन करण्याकरिता नियम, नियमावली, अनुदेश, नियम पुस्तिका आणि अभिलेख.

संघटनेने नेमून दिलेल्या कार्य व कर्तव्याचे पालन करण्याकरिता कर्मचा-यांकडून खालील नियम, नियमावली, नियम पुस्तिका, अधिसूचना यांचा वापर केला जातो. बृहन्मुंबईमध्ये सांविधिक अधिनियम, नियमावली आणि महाराष्ट्र शासनाच्या नागरी विकास खात्याकडून आलेल्या निदेशांव्दारे महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील विकास उपक्रमांचे नियंत्रण इमारत प्रस्ताव खाते करते. जसे -

- 1888 चा मुंबई महानगरपालिका अधिनियम.
- 1966 चा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम.
- 1969 चा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ अधिनियम.
- 1974 चा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम.
- 1975 चा नागरी क्षेत्र वृक्ष परिरक्षण अधिनियम.
- 1976 चा नागरी भूखंड (परामर्यादा व नियमावली) अधिनियम.
- 1976 चा महाराष्ट्र गृह निर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम.
- 1986 चा पर्यावरण बचाव अधिनियम.
- 1991 ची विकास नियंत्रण नियमावली.
- राज्य शासनाच्या नागरी विकास खात्याने दिलेल्या विविध अधिसूचना / निदेश.

उपरोल्लेखित विविध अधिनियम, नियम आणि नियमावली सर्व अग्रेसर पुस्तकालयात सहज उपलब्ध आहेत.  विविध राज्य शासन / अधिसुचना / अनुदेश आणि मुंबई महानगरपालिकेची परिपत्रके संकलित स्वरुपात निम्नलिखित PEATA च्या कार्यालयात इलेक्ट्रॉनिक स्वरुपात (C.D.) उपलब्ध आहेत.

पूर्वभाग क्र.445, तळमजला, नागरी टेरेस, सोनवाला अग्यारी मार्ग, ऑफ एन.एम.छोटानी रोड, माहिम (प), मुंबई-400 016.